**व्यवसाय / धंधा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...

501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २७७ वा | मंगळवार, दि. १७ जून २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# महायुतीचा महाभ्रष्ट कारभार? शिवरायांच्या पुतळ्यात भ्रष्टाचार?

## राजकोटवरील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याखाली अवघ्या महिनाभरात भगदाड

**मालवण (कटूसत्य वृत्त):-** महायुती सरकारने केलेल्या निकृष्ट बांधकामामुळे आज मालवणच्या राजकोटवरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याची जमीन खचून मोठे भगदाड पडले. पुतळा भक्कम आहे, पण चबुतऱ्याच्या चिरेबंदी पायालाच तडे गेल्याने पुतळ्याच्या सुरक्षेबाबतही प्रश्न निर्माण झाला आहे. उद्घाटनानंतर अवघ्या महिनाभरातच हा प्रकार घडल्याने शिवप्रेमींमध्ये सरकारबद्दल प्रचंड संताप व्यक्त होत आहे.

### चिऱ्यांनी बांधलेला पाया खचला

मालवणच्या राजकोट किल्ल्यावर 4 डिसेंबर 2023 रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते, परंतु अवघ्या आठ महिन्यांत 26 ऑगस्ट 2024 रोजी तो 40 फुटांचा पुतळा कोसळून पडला होता. त्यानंतर महायुती सरकारने मोठा गाजावाजा करत नवा पुतळा उभारला. ज्येष्ठ व ख्यातनाम शिल्पकार राम सुतार यांच्या देखरेखीखाली हा पुतळा उभारण्यात आला. दहा फुटी चबुतऱ्यासह तो पुतळा 93 फूट उंच आहे. त्याचे उद्घाटन 11 मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले होते. परंतु पुतळ्याच्या उजव्या बाजूला चबुतऱ्याजवळील जमिनीला भगदाड पडल्याने पुन्हा एकदा सरकारच्या निष्काळजीपणाचा पदार्फाश झाला आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर शिवप्रेमी आणि नागरिकांकडून सरकारवर टीका होत आहे. सरकारने योग्य खबरदारी घेऊन महापुरुषांचे पुतळे उभारावेत, अशी मागणी होत आहे.





### कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करा

शासनाने पुतळे उभारणीसाठी एक धोरण ठरवले पाहिजे. शिल्पकार, वास्तुविशारद, कलाकार, संशोधक, साहित्यिक, दूरदृष्टी असलेल्या व्यक्तींचा सल्ला घेतला पाहिजे, असे इंद्रजीत सावंत म्हणाले. याप्रकरणी संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हायलाच पाहिजे अशी मागणी करताना, आज मंत्रालयच पंत्राटदार चालवताहेत, ते फक्त चौरस फुटामध्ये फायदा किती मिळेल हेच बघतात, असा आरोपही इंद्रजीत सावंत यांनी केला.

### किल्ल्यावरील पोलीस बंदोबस्त वाढवला

भगदाड पडलेल्या ठिकाणाच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच किल्ल्यावरील पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. मुसळधार पाऊस होत असल्याने चबुतऱ्याच्या जमिनीखालील माती वाहून गेल्याने भगदाड पडल्याचा दावा प्रशासन करत आहे. शिवरायांच्या पुतळ्याला कोणताही धोका नसल्याचा दावाही त्यांनी केला.

## पहिलीच्या नवागतांचे बैलगाडीतून मिरवणूक पालकमंत्र्यांनी बैलगाडीचे केले सारथ्य

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आधुनिक शिक्षण प्रणालीच्या माध्यमातून शाळांना मॉडेल बनवण्याचे काम केंद्र व राज्य शासन करीत आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळावे यासाठी शासन शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध योजना, उपक्रम राबवित आहे. विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे शिक्षण मिळावे यासाठी केंद्र व राज्य शासन शालेय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या पाठीशी आहे, असे प्रतिपादन ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

आज दिनांक 16 जून पासून नवीन शैक्षणिक वर्षाला प्रारंभ झाला आहे. शाळा प्रवेशोत्सवाच्या अनुषंगाने राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या तुंगत येथील शाळेला भेट दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम,उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, सरपंच डॉ अमृता रणदिवे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वामन वनसाळे, यांच्यासह मान्यवर पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.





यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, शाळेची गुणवत्ता वृद्धींगत करण्यासाठी व मुलांची उपस्थिती वाढविण्याकरीता शासनाच्या शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यभर 'शाळा प्रवेशोत्सव' उपक्रम साजरा करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील गोरगरिबांची मुले शिकली पाहिजेत. प्रत्येक मुलाने शाळेत प्रवेश घेतला पाहिजे. जे पालक शिक्षणापासून वंचित आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे मुले शाळेत पाठवले जात नाहीत अशा पालकांनी आपल्या मुलाला शाळेत पाठविण्यासाठी हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. शाळा चांगल्या असाव्यात म्हणून आदर्श शाळा निर्माण करण्याचे काम शासन करीत आहे. तसेच अनेक शाळेमध्ये डिजिटल शिक्षण देण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

### पहिलीच्या नवागतांचे बैलगाडीतून मिरवणूक पालकमंत्र्यांनी बैलगाडीचे केले सारथ्य

**पडत्या पावसातही पालकमंत्र्यांनी केले: भाषणाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा तुंगत या ठिकाणी प्रवेशोत्सवानिमित्त नवागतांचे स्वागत करण्यासाठी बैलगाडीच्या माध्यमातून व ट्रॅक्टरच्या माध्यमातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी स्वतः पालकमंत्र्यांनी बैलगाडीचे सारथ्य केलं. तसेच पालकमंत्री यांचे भाषण सुरु असतानाच पाऊसाला सुरुवात झाली. यावेळी पाऊसामुळे काही विद्यार्थ्यांचा चुळबुळ सुरू असताना पालकमंत्री यांनी मुलानो शांत बसा ... हाताची घडी.. तोंडावर बोट म्हणातच विद्यार्थी एकदम शांत झाले व पडत्या पावसातीही विद्यार्थ्यांनी भाषणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तत्पुर्वी शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती घेत शिक्षक व विद्यार्थ्यांचे मंत्री गोरे यांनी कौतुक करुन विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देवून स्वागत केले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी शासनामार्फत मुलांना गणवेश, शूज पाठ्यपुस्तके देत आहे. मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेत चांगल्या दजार्चे शिक्षण मिळावे यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षक उपलब्ध करून देत आहेत. कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये तसेच विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे शिक्षण घ्यावे, राज्यातील ग्रामीण भागातील सर्व जिल्हा परिषद शाळांना विद्यार्थ्यांनसाठी सुविधा पुरविण्याचे काम ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे पालकमंत्री श्री गोरे यांनी सांगितले.

तसेच आपल्या सर्वांना अभिमान वाटेल अशी शाळा आणि शिक्षणाचा दर्जा उंचवण्याचं काम तुंगत येथील जिल्हा परिषद शाळेचे आहे. या शाळेने इंजिनियर ,डॉक्टर उच्च अधिकारी बनवण्याचं काम केलं आहे आज या शाळेत ज्या बालकांनी प्रवेश घेतला आहे ती मुले भविष्यात उच्च शिक्षित होतील अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली

## राज्यात पावसाचा हाहाकार!

### नद्यांनी ओलांडली धोक्याची पातळी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात मागील दोन दिवसांपासून मुसळधार पावसाने हजेरी लावलीये. अनेक ठिकाणी गुडघाभर पाणी साचले असून वाहतूकीचे तीनतेरा वाजली आहेत. ऑफिसला निघालेल्या लोकांचीही चांगलीच तारांबळ उडाली. या पावसाचा थेट परिणाम मुंबई लोकलवर पडलाय. पुण्यातील काही नद्यांनी धोक्याची पातळी देखील ओलांडली आहे. राज्यभर पाऊस पडतोय. मुळात म्हणजे यंदा राज्यात मॉन्सून लवकर दाखल झालाय. मात्र, शेतकऱ्यांनी अजून पेरणीला सुरूवात केली नाहीये. या मुसळधार पावसामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाल्याचेही बघायला मिळत आहे.

मुंबईतील मेट्रो 1 ची सेवा सोमवारी दुपारी ठप्प झाली होती. आझाद नगर रेल्वे स्थानकात ताडपत्री ओव्हरहेडमध्ये अडकल्याने हा तांत्रिक बिघाड झाला होता. 15 मिनिटांनी वाहतूक पूर्ववत झालीये. घाटकोपरमध्येही पाणी भरताना दिसत आहे. लांजा बसस्थानकात पाणी भरले आहे. रत्नागिरी कशेडी बोगद्यामुळे दरड कोसळली आहे. लोणावळ्यातील भूशी डॅम ओव्हरफ्लो झाला असून पर्यटकांनी गर्दी केली आहे. पुण्यातील जगबुडी नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. मुसळधार पावसामुळे लोणावळ्यातील भूशी डॅम 100 टक्के भरला असून ओव्हरफ्लो झालाय.





उल्हासनगर येथे 500 पेक्षा जास्त घरांचा येण्या-जाण्याचा मार्ग झाला बंद झालाय. नाल्यावरील पूल कोसळतानाची दृश्य सीसीटीव्हीत कैद झाली आहेत. मुसळधार पावसामुळे नाल्यावरील पुल तुटलाय. मुसळधार पावसामुळे उल्हासनगरच्या गणेश नगर भागात नाल्यावरील पूल कोसळल्याची घटना घडलीय. या घटनेमुळे लोकांना आपल्या घराच्याबाहेर निघणे देखील शक्य होत नाही. सातत्याने पडणारा मुसळधार पाऊस यामुळे चिपळूणच्या वाशिष्ठी नदीपात्राची पातळी वाढली आहे.

पिरंगुटमधील स्मशानभूमी देखील पावसामुळे पाण्याखाली गेलीये. पूलाचा भराव रस्ता वाहून गेला. पुण्यातील मुळशी तालुक्यात रात्रभर कोसळलेल्या मुसळधार पावसाने पिरंगुट परिसरात हाहाकार उडाला आहे. पुणे कोलाड महामार्गावरील तात्पुरता बांधलेला भराव रस्ता पाण्याच्या लोंढ्याने वाहून गेला आहे. अजूनही पावसाचा जोर कायम असल्याचे बघायला मिळत आहे. फक्त पाऊसच नाही तर वारेही मोठ्या प्रमाणात सुटले आहे.

छत्रपती संभाजीनगर, परभणी, पुणे, पिंपरी चिंचवड, कल्याण, ठाणे, लातूर, नांदेड आणि कोकणात सध्या पावसाच्या सरी कोसळताना दिसत आहेत. पुढील काही तासांसाठी पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. यामुळे नागरिकांनी खूप महत्वाचे काम असल्याशिवाय घराबाहेर पडणे टाळावेच. भारतीय हवामान विभागाने 24 तासांसाठी पावसाचा रेड अलर्ट दिला होता. हवामान खात्यानुसार, विदर्भाच्या काही भागांमध्येच आता मान्सून पोहोचणे शिल्लक आहे. बाकी बहुतांश भाग मान्सूनने व्यापला आहे.

## दुधाचे दर घसरले, उत्पादक अडचणीत

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** इंदापूर तालुक्यात दूध उत्पादन हा केवळ व्यवसाय नाही, तर अनेक कुटुंबांचा श्वास आहे. गायी-भाकड जनावरांची सेवा करताना शेतकरी स्वतःच्या लेकरासारखं त्यांचं संगोपन करतो; मात्र याच दुधाला बाजारात न्याय्य दर मिळत नसेल, तर शेतकऱ्यांच्या कष्टांना अर्थ उरत नाही.

मागील काही दिवसांपासून दूध दरात टप्प्याटप्प्याने घसरण सुरू असून, यामुळे पशुपालक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अवकाळी पावसाने आधीच दुभत्या जनावरांच्या आरोग्यावर परिणाम केला होता. त्यानंतर आता दूध पावडर आणि बटरच्या दरात घसरण झाल्याने 25 मेपासून दूध संकलन दरात प्रतिलिटर दोन रुपयांची कपात करण्यात आली आहे.

इंदापूर तालुका हा राज्यात दूध उत्पादनाच्या आघाडीवर आहे. सोनाई, अमूल, दूधगंगा, नेचर, गोविंद आदी प्रकल्पांमार्फत दैनिक लाखो लिटर दूध संकलन होत



असले तरी याचा लाभ शेतर्कयाच्या पदरात कितपत पडतो, हा खरा प्रश्न आहे. सध्या 3. 5 फॅट आणि 8. 5 एसएनएफ असलेल्या दुधाला फक्त 32 रुपये प्रति लिटर दर दिला जात आहे. पूर्वी याच दुधाला 34 रुपये दर मिळत होता.

### आशेची वाट... की तोट्याचा व्यवहार?

शेतीच्या अस्थिर उत्पन्नामुळे अनेक तरुणांनी दुग्ध व्यवसायाकडे वळण घेतले. काहींनी कर्ज काढून मुक्त गोठे उभारले, महिलांनी आत्मनिर्भरतेचा मार्ग निवडला. गावोगाव 'दुधात पैसे आहेत' असं म्हणून ही वाट चालायला सुरुवात केली. गाईच्या संगोपनासाठी महिन्याला 15 ते 17 हजार रुपये खर्च येतो - चारा, पशुखाद्य, औषधं, मजुरी, वीज इ. त्यामानाने उत्पन्न फक्त 10 ते 12 हजार रुपयेच.

ही केवळ आकड्यांची घसरण नसून शेतर्कयाच्या तुटत चाललेल्या अपेक्षांची कहाणी आहे. गाईला वेळेवर चारा, पाणी, औषधं, औषधपाणी, झुल देणं, भाकड काळातही सांभाळणं झ्र हे सगळं शेतकरी आईच्या मायेसारखं करत असतो. पण जेव्हा त्याच दुधाला बाजारात नफा देण्याऐवजी तोटा मिळतो, (पान 2 वर..)

## नवीन शैक्षणिक वर्षाची दमदार सुरुवात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरात विविध शाळेमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाची दमदार सुरुवात करण्यात आली अनेक शाळेत शाळा प्रवेश उत्सव कार्यक्रमांनी झाली. विविध इयत्तेतील विद्यार्थी तसेच नवीन प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, चॉकलेट, फुगे देवून, फुलांचा वर्षाव करत मोठ्या उत्साहात स्वागत केले. शाळेने विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आकर्षक रंगरंगोटी रांगोळी कार्टून, फुग्यांची सजावट, सेल्फी पॉईट करून आनंददायी वातावरण निर्माण केले होते.







अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या

**सेक्स समस्या**

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन



**डॉ.अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)

B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu ).,P. G ( Sexology )

२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)

१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार

**सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक**

विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

www.sextreatment.in

94 22 23 90 13


## मुलींच्या संरक्षण व सुरक्षिततेची जबाबदारी शाळेची, शिक्षकांनी आपल्या पाल्य प्रमाणे त्यांच्यावर संस्कार करावेत - जिल्हाधिकारी आशीर्वाद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** आजपासून शाळांना सुरुवात होत आहे, येथील शाळेमध्ये 25 विद्यार्थिनी नव्याने पहिल्या वर्गात प्रवेश घेत आहेत, त्यांच्यासाठी तर हा आज खूप खास दिवस आहे. अशा विद्यार्थिनींचा आनंद उत्साह वाढवण्यासाठी शाळेने खूप चांगली तयारी केलेली आहे. सर्व विद्यार्थिनींनी शाळेचा आनंद घ्यावा शिक्षक वर्ग अभ्यास करून घेतीलच परंतु आपण परस्परात मैत्रीचे नाते तयार करावे. शाळेतील विद्यार्थिनींची सुरक्षितता व संरक्षणाची जबाबदारी ही शाळेची असून येथील शिक्षक वर्गांनी आपल्या पाल्याप्रमाणे विद्यार्थिनीला संस्कार द्यावेत असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या देगाव येथील मुलींच्या शाळेत आयोजित शाळेच्या पहिला दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वर्ग तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सर्व विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये शिक्षक वगार्ने जे विविध विषयाचे ज्ञान देतील ते आत्मसात केले पाहिजे. सर्वच विषयात विशेषता इंग्रजी, गणित व विज्ञान शाखेत अधिक प्राविण्य मिळवावे. येथील शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना आपल्या स्वतःच्या पाल्याप्रमाणे शिक्षण व संस्कार द्यावेत. तसेच शाळेमध्ये तक्रारपेटी ठेवून त्यात आलेल्या तक्रारीवर कार्यवाही केली पाहिजे. विद्यार्थ्यांना खूप चांगले शैक्षणिक वातावरण येथे निर्माण करून देण्याबाबत शाळेने पुढाकार घ्यावा असेही त्यांनी सुचित केले.

विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेण्याबरोबरच आई-वडील व शिक्षक वर्गाचा आदर करण्यास शिकले पाहिजे. इतर विद्यार्थ्यांसोबत चांगली मैत्री केली पाहिजे. आज मी या शाळेत आलेलो असून पुढील 25 वर्षांनी या शाळेतील विद्यार्थिनी आपले ध्येय गाठून मोठ्या पदावर जाऊन जेव्हा माझी भेट होईल तेव्हा त्यांनी त्यांच्या आठवणी मला सांगाव्यात असेही आवाहन जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी करून त्यांच्या प्राथमिक शिक्षण घेत असलेल्या दार्जिलिंग येथील शाळेच्या पहिल्या दिवसाची आठवण ही सांगितली.

देगाव येथील 25 विद्यार्थिनी आज येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेत असून त्यांचा शालेय जीवनाचा हा पहिला दिवस होता त्यांचे स्वागत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांमध्ये जिल्हाधिकारी स्वतः आपल्या शाळेत येऊन आपले स्वागत करत असल्याबद्दल खूप आनंद व उत्साह होता.

पहिल्या वर्गाच्या या सर्व विद्यार्थ्यांनी सोबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी शाळेच्या मैदानात खाली बसून संवाद साधला. व त्यांच्यात खूप उत्साह व आनंद निर्माण केला.

प्रारंभी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी प्रास्ताविक केले. तसेच जिल्हा परिषदेची या शाळेची माहिती देऊन आजचा शैक्षणिक वषार्चा पहिला दिवसाबद्दल सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

### चार हजार 32 शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा

यावर्षीच्या शैक्षणिक वर्षाचा आजचा हा पहिला दिवस होता. जिल्हा परिषदेच्या 2773 शाळा व इतर बाराशे 59 शाळा अशा चार हजार 32 शाळांमध्ये खूप उत्साह आनंदाने विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. सोलापूर शहर व अन्य ठिकाणी सर्व शाळांमधील शिक्षक वर्गांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ तसेच पुष्पवृष्टी करून स्वागत केले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. तसेच एवढ्या मोठ्या उत्साहाने सर्व ठिकाणच्या शाळा विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करत असल्याचे पाहून पालक वर्गामध्ये ही आनंद होता.

## संपादकीय

# स्वदेशी एआय मॉडेलची उपेक्षा

बालेन्दु शर्मा दाधिचचीनचे एखादे एआय मॉडेल लाँच होताच त्याच दिवशी लाखो लोक डाउनलोड करतात. मात्र भारतीय 'सर्वम एम' हे एआय मॉडेल लाँच झाल्यानंतर केवळ पाचशे लोकांनीच डाउनलोड केले. देशातील 'सर्वम' या एआय स्टार्टअप कंपनीने अलीकडेच सर्वात मोठे लार्ज लँग्वेज मॉडेल 'सर्वम एम' लाँच केले. बंगळुरूच्या या कंपनीची निवड भारत सरकारने देशातील पहिल्या आत्मनिर्भर लार्ज लँग्वेज मॉडेलच्या (एलएलएम) विकासासाठी केली होती. 'एलएमएम'चा संबंध जनरेटिव्ह एआय मॉडेलशी असून त्यास 'अथाह टेस्ट डेटा'च्या माध्यमातून विकसित केले जाते. या प्रशिक्षणातून त्यांच्यात असामान्य एआय क्षमता विकसित होते. विशेष म्हणजे चॅटजीपीटी देखील असेच मॉडेल आहे.

सर्वम एम लाँच होणे हा स्वदेशी एआय तंत्रज्ञानाच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा आहे. मात्र दुर्सया एआय मॉडेलची ज्या पद्धतीने जगात आणि सोशल मीडियावर चर्चा होते तशी या मॉडेलची झाली नाही. एआयच्या क्षेत्रात भारताची महत्त्वाकांक्षा लपून राहिलेली नाही. भारताने 10.370 कोटी रुपयांचे 'इंडिया एआय मिशन' लाँच केले. या माध्यमातून 'सर्वम'ची निवड करण्यात आली. पण सर्वम एम मॉडेलला मिळर्णाया सामान्य प्रतिसादावरून आयटी उद्योगात निराशेचे वातावरण आहे. कारण तीन चार दिवसांत केवळ एक हजारपेक्षाही कमी डाउनलोड करण्यात आले. वास्तविक सुरुवातीच्या दोन दिवसांत ही संख्या 50 पेक्षा कमी होती, मात्र कमी डाउनलोडची बातमी सोशल मीडियात पसरल्यानंतर त्याची संख्या काही प्रमाणात वाढली. सर्वाधिक लोकसंख्या असर्णाया देशात विज्ञान, टेक्नॉलॉजी, इंजिनिअरिंग आणि गणित या विषयातील पदवीधर असताना स्वदेशी 'एलएलएम'साठी उत्साहाचा अभाव असणे निराशाजनक आहे. प्रामुख्याने सर्वम-एम हे 10 भारतीय भाषांवर केंद्रित लॉर्ज लँग्वेज मॉडेल आहे. देशातील 90 टक्क्यांपेक्षा अधिक नागरिक हीच भाषा बोलतात. मुद्दा सर्वम-एम पुरताच मर्यादित नाही. आणखी एक स्वदेशी एआय कंपनी 'भारत जेन'च्या परम-1 नावाच्या लार्ज लँग्वेज मॉडेलचा देखील आहे. आतापर्यंत केवळ 12 वेळाच ते डाउनलोड करण्यात आले आहे. हे मॉडेल भारत सरकारच्या एआय कोष नावाच्या पोर्टलवर उपलब्ध आहे. अर्थात या मॉडेलला मिळर्णाया प्रतिसादाची तुलना चॅटजीपीटीशी करणे चुकीचे ठरेल. तरी काही मंडळी अन्य लहान मॉडेलशी तुलना करतीलच.

मॅनलो वेचर्स नावाच्या वेंचर कॅपिटल फर्मचे तज्ज्ञ डी. डी. दास यांनी सर्वम-एमच्या डाउनलोडची संख्या कमी असणे हे अस्वस्थ करणारे असल्याचे म्हटले आहे. तसेच भारतीय भाषांच्या स्वदेशी मॉडेलला बाजारात खरोखरच मागणी आहे का? असा प्रश्न केला. त्यांनी कोरियाच्या दोन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या 'दिया' नावाच्या 'एलएलएम' मॉडेलचा उल्लेख केला. या मॉडेलला एक महिन्यात सुमारे दोन लाख डाउनलोड केल्याची नोंद आहे. मात्र चीनचे डीपसीक, क्वेन आणि अन्य दुसऱ्या मॉडेलला काही दिवसांतच लाखोंच्या संख्येने डाउनलोड करण्यात आले.

संकेतस्थळावर लाखो खाते तयार करून लोकांनी त्याचा वापरही सुरू केला. चॅटजीपीटी, गूगल जेमिनी, क्लॉड, परप्लेक्सिटी आदीची लोकप्रियता आपण सर्वांनी पाहिलीच आहे. चॅटजीपीटीला पहिल्या पाच दिवसांतच दहा लाख लोकांनी सबस्क्राइब केले होते. भारत सरकारचे आणि आयटी उद्योगांचे प्रयत्न व संकल्प कुठेतरी कमी पडत आहेत म्हणूनच बाजारात मागणीच नाही. काही महिन्यांपूर्वी ओला कंपनीचे संस्थापक भाविश अग्रवाल यांच्या एआय स्टार्टअप 'कृत्रिम'ने देखील एलएलएम लाँच केले. त्यांना देखील बर्याच प्रमाणात टीकेला सामोरे जावे लागले होते. यामागचे कारण म्हणजे अनुवाद योग्यरितीने न होणे, तथ्यातील चुका आणि आकलन क्षमतेत उणिवा यासारख्या गोष्टी होत्या. पण अशा प्रकारची टीका करणारी मंडळी काही बाबी विसरतात.

जेमिनी, चॅटजीपीटी आणि इलॉन मस्क यांच्या ग्रोकसारख्या अमेरिकी कंपन्यांनी देखील कमी चुका केलेल्या नाहीत. या चुका हळूहळू कमी झाल्या आणि त्या नावारुपास आल्या असे म्हणता येईल. 'सर्वम एम' हे सक्षम लार्ज लँग्वेज मॉडेल असून ते फ्रेंच ओपन सोर्स मॉडेल 'मिस्त्राल'च्या आधारावर विकसित करण्यात आले आहे. म्हणजे शंभर टक्के भारतीय उत्पादन नाही. तरीही भारतीय भाषेतील 24 अब्ज पॅरामिटर्स असणाऱ्या या ओपन सोर्स मॉडेलने अनेक पातळीवर 'एलएलएम'पेक्षा चांगली कामगिरी केली आहे. यात लामा-4 स्काउट (मेटा) याचा समावेश आहे.

भारताला स्वदेशी मॉडेलची गरज आहे आणि यात शंका असण्याचे कारण नाही. कारण टेक्नॉलॉजी, सामरिक, राजनैतिक आणि व्यापारी क्षेत्रात जागतिक शक्ती होण्यासाठी आपण दुसऱ्या तंत्रज्ञानावर पूर्णपणे अवलंबून राहू शकत नाहीत. आपल्या देशात चांगल्या प्रकारे एआय इको सिस्टम विकसित होत आहे आणि सरकारचा प्रयत्न देशाला एआय हब करण्याचा आहे. यासाठी वातावरण तयार होत असले तरी त्याचा वेग कमी आहे. याला बुस्ट द्यावा लागेल. देशाच्या कानाकोपऱ्यात नवीन तंत्रज्ञानाच्या बाबतीत केवळ कुतूहल राहू नये तर कौशल्यही वाढावे, संशोधनात गती यावी आणि शोधही युद्धपातळीवर व्हायला हवेत. मागणी आणि पुरवठा या दोन्हीत आपली छाप पाडणे आवश्यक आहे. यासाठी लोकांनाही पुढे यावे लागेल. आपल्या देशात तयार होणाऱ्या कामाची दखल घ्यायला हवी. केवळ समीक्षकांच्या दृष्टीने न पाहता त्याला महत्त्व आणि प्रोत्साहन द्यायला हवे. अशा पद्धतीने प्रयत्न यशस्वी होत असतील तेव्हाच त्या देश एआयच्या पातळीवर वेगाने वाटचाल करेल.

पान १ वरून

## पुण्यातील गुन्हेगाराचा...

तेव्हा हतबलतेची किनार दूध उत्पादकांच्या बोलण्यात दिसते. शेतकरी आज दर कपातीवर बोलतोय, पण उद्या हा व्यवसाय सोडून देण्याच्या विचारात असेल, तर त्याची जबाबदारी कोणाची? गावागावात जनावरं आहेत, पण त्यांचे रक्षण करणारे शेतकरी जर आर्थिकदृष्ट्या टिकले नाहीत, तर ही साखळी तुटेल आणि तेव्हा उशीर झालेला असेल.

**बाजारभावाचा घसरता आलेख**

मे महिन्यात पावसाच्या आगमनामुळे आइस्क्रीम, दही, ताक यांची मागणी कमी झाली. परिणामी, दूध प्रकल्पांमध्ये साठा वाढला. त्याचा थेट परिणाम दूध पावडर आणि बटरच्या दरावर झाला

» दूध पावडर – प्रतिकिलो दरात 30 घसरण
» बटर – प्रतिकिलो दरात 20 घसरण

यामुळे प्रकल्पांनी दर कपात केली असून, पुढे आणखी कपात होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. ही बाजाराची प्रतिक्रिया असली, तरी परिणाम फक्त आणि फक्त शेतकऱ्याच्या ताटात दिसतो.

**सरकार कुठे आहे?**

» शेतकऱ्यांनी शासनाकडे खालील मागण्या केल्या आहेत
» दूधाला हमीभाव जाहीर करावा
» पशुखाद्यावर अनुदान मिळावे
» साठवणूक करणाऱ्या प्रकल्पांना मदत द्यावी
» बाजार हस्तक्षेप योजना राबवावी
» याशिवाय, दूध उत्पादन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार आहे, हे लक्षात घेऊन दीर्घकालीन योजना राबवण्याची गरज आहे.

# प्रगत तंत्रज्ञान व मोबाईलच्या युगात लहान मुलांमध्ये सहनशीलतेचा अभाव - एक गंभीर समस्या

मोबाईल न दिल्याने मुलाने गळफास लावून घेतला, टी.व्ही. रिमोट न दिल्याने नऊ वर्षाच्या मुलीने केली आत्महत्या. अशा बातम्या वाचून मन अगदी सुन्न होते. हार स्वीकारणे किंवा अपमान पचविण्याची क्षमता मुलांमध्ये अतीअल्प दिसून येते.जरा काही झाले की मुले आत्महत्येचे पाऊल उचलतात.

आज-काल मोबाईल किंवा तंत्रज्ञान प्रधान युगात एक महत्त्वाची बाब लक्षात येते ती म्हणजे मुलांमध्ये सहनशीलता अतिशय कमी दिसते.ही बाब चिंतेची आहे कारण सहनशीलता ही व्यक्तिमत्व विकासासाठी आणि समाजात मिळून मिसळून राहण्यासाठी आवश्यक गुण आहे. वास्तविक पाहता सहनशीलता म्हणजे एखाद्या त्रासदायक किंवा अवघड परिस्थितीत शांतपणे राहण्याची व तणाव न घेता परिस्थिती स्वीकारण्याची क्षमता, विवेकशीलता दुस ्यांना समजून घेण्याची क्षमता आणि आलेल्या अडचणींना सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून त्यावर मात करण्याची क्षमता सहनशीलतेमुळे येते. हल्ली हे गुण मुलांमध्ये कमी दिसतात. लहान सहान गोष्टींवर मुले राग व्यक्त करतात,मतभेद सहन करत नाहीत. अपयश पचवू शकत नाहीत. हे आई वडील किंवा नातेवाईक मित्र कोणीही थोडे रागावले तरीही मुले रडतात नाराज होतात रुसतात.अपमान किंवा अपयश सहन करीत नाहीत.

एकेकाळी संयम शिस्त आणि सहनशीलता हे बालपणाचे मूळ गुण समजले जात होते पण आज त्याचा अभाव सर्वत्र दिसून येतो व याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत.अति लाड करणे हवे ते बालकांना तात्काळ देणे यामुळे बालकांमध्ये नकार पचवण्याची मानसिकता राहत नाही काही मागितले तर लगेच मिळायला हवे ही मानसिकता तयार होते आणि पुढे जाऊन तशीच सवय बालकांना लागते अर्थात पाहिजे ते मिळालेच पाहिजे नाही मिळाले तर मुलांना असह्य होते. प्रत्येक गोष्ट मिळण्यासाठी थोडा वेळ लागतो हे शिकवणे आवश्यक आहे. त्यामुळे मुले संयम आणि प्रतीक्षा शिकतात काही वेळा जाणीवपूर्वक पालकांनी मुलांची मागणी अमान्य करून ती वस्तू न दिल्यास मुलांमध्ये प्रतीक्षा करण्याची मानसिकता वाढते त्यामुळे पालकांनी मुलांना मागतील ती वस्तू न देता संयम बाळगण्यास कृतीतून शिकवावे. खरे तर सध्या मोबाईल इंटरनेटमुळे मुले मैदानी खेळ विसरलीच आहेत तासनतास मोबाईल घेऊन गेम खेळत राहणे मुलांना आवडते. मोबाईल म्हणजे हे लहान थोरांना लागलेले एक व्यसनच आहे हे व्यसन एकदा लागले तर त्यातून बाहेर पडणे अवघड जाते. मोबाईलच्या अतिवापरामुळे मैदानी खेळापासून मुले लांब गेली आहेत.दिवसभर चुकीच्या पद्धतीने बसून मोबाईल गेम खेळत राहणे यामुळे डोळ्यांचा त्रास वाढतो, भूक मंदावते शरीरात चरबीचे प्रमाण वाढते, व्यायाम कमी होतो व शरीर स्थूल होऊन जाडी वाढते.कष्ट घेण्याची श्रम करण्याची सवय मुलांमध्ये कमी होते, बैठे काम करत राहणे हळूहळू मुलांमध्ये सवयच बनून जाते मैदानी खेळामुळे शरीराची वाढ व व्यायाम चांगल्या पद्धतीने होतो, भूक वाढते, पचनक्रिया चांगल्या पद्धतीने होते, शरीर तंदुरुस्त रहाते व उत्साह संचारतो. खेळामुळे शरीर तंदुरस्त निरोगी राहते. सांघिक खेळामुळे नेतृत्व करण्याची, खेळताना हार स्वीकारण्याची, नियम पाळण्याची सहकार्यांना जुळवून घेण्याची, एकमेकांना समजून घेण्याची, एकजुटीने राहण्याची भावना मुलांमध्ये निर्माण होते.मैदानी खेळ हे जीवन शिक्षणाचं मोठं साधनच आहे .

पालकांनी मुलांना योगासने, ध्यानधारणा शिकवावे त्यामुळे मानसिक आरोग्य सदृढ होते, वेळोवेळी चांगली पुस्तके वाचण्यासाठी आणून द्यावेत रामायण, महाभारत, संतांची चरित्रे, देशभक्तांच्या प्रेरणादायी कथा यामधून सहनशीलतेची उदाहरणे मुले अनुभवतात व हे मुलांच्या मनात खोलवर बिंबते आणि वाचनामुळे पुस्तकांविषयी गोडी निर्माण होऊन अभ्यासातही रुची निर्माण होते यासाठी पालकांनी स्वतः मुलांसमोर मोबाईल न घेता पुस्तक घेऊन वाचन केल्याने मुले आपोआप पुस्तकांकडे वळतात. मुले सदैव मोठ्यांचे अनुकरण करीत असतात. मुलांमध्ये वाचनाची सवय किंवा आवड निर्माण करण्यासाठी पालकांनी जवळपासच्या ग्रंथालयात घेऊन जावे.यामुळे मुले वेगवेगळी पुस्तके पाहतात आणि पुस्तक उघडून त्या पुस्तकात काय काय लिहिले आहे किंवा असेल या उत्सुकतेने वाचनास सुरुवात करतात. परिणामी वाचनाची आवड मुलांमध्ये निर्माण होते मोबाईल पासून मुलांना दूर ठेवण्यासाठी मैदानी खेळ,वाचनालय हे उत्तम पर्याय आहेत ते पालकांनी मुलांसोबत अंगीकारले पाहिजे तरच मोबाईल पासून मुलांना थोडे दूर ठेवण्यात पालक यशस्वी होतील. मोबाईल गेम्स खेळत राहिल्यामुळे मुले एकल कोंडी होतात स्वतःचे विश्व बनवतात व बाहेर काय चाललं आहे याच्याशी काही आपल्यास देणंघेणं नाही असे वागतात.भुख मंदावते व चिडचिडेपणा यामुळे वाढीस लागतो.

मुळात सहनशीलता म्हणजे कमकुवतपणा नाही ते म्हणजे धैर्य, शांती आणि समजूतदारपणा आजच्या धकाधकीच्या जगात मुले बाहेरून जरी स्मार्ट आणि आत्मविश्वासी वाटत असली तरी त्यांना अंतर्गत बळ आणि भावनिक स्थैर्याची गरज आहे आणि त्यासाठी सहनशीलता हा सर्वात महत्त्वाचा गुण आहे आपण सर्वांनी मिळून ही गुणवत्ता पुढच्या पिढीमध्ये रुजवली तरच समाज सशक्त समंजस आणि संतुलित होईल. मोबाईल हे एक उपयुक्त साधन आहे पण त्याचा अतिरेकी वापर मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करतो म्हणून पालकांनी सजग राहणे आवश्यक आहे मोबाईलच्या व्यसनापासून लहान मुलांचे संरक्षण करणे ही आजच्या काळातील एक मोठी समस्या आणि जबाबदारी आहे योग्य मार्गदर्शन वेळेचे व्यवस्थापन आणि प्रेमळ शिस्त या माध्यमातून आपण मुलांना या व्यसनापासून दूर ठेवू शकतो आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी योग्य दिशा दाखवू शकतो.



**नूरजहाँ शेख**
गणेशगांव ता. माळशिरस
जिल्हा -सोलापूर

# धरती आबा योजनेंतर्गत पालघर जिल्ह्यातील ६३५ गावांचा समावेश -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत धरती आबा लोकसहभाग मोहिमेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

**पालघर (कटूसत्य वृत्त):-** देशातील आदिवासी समाजाच्या जीवनामध्ये मूलभूत परिवर्तन करण्याकरिता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत धरती आबा लोकसहभाग योजना सुरू केली असून या योजनेंतर्गत राज्यातील 32 जिल्ह्यांचा समावेश होणार आहे. या योजनेंतर्गत पालघर जिल्ह्यातील 635 गावांचा समावेश होणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत धरती आबा लोकसहभाग मोहिमेचा शुभारंभ पालघर जिल्ह्यातील मनोर येथे करण्यात आला यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. या कार्यक्रमास वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक, कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, (दूरदृश्यप्रणालीद्वारे) आदिवासी क्षेत्र आढावा समिती अध्यक्ष विवेक पंडित, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, माजी मंत्री रवींद्र चव्हाण ,खासदार डॉ. हेमंत सावरा, आमदार सर्वश्री राजेंद्र गावित , स्नेहा दुबेझ पंडित, राजन नाईक, हरिश्चंद्र भोये, निरंजन डावखरे, आदिवासी विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनीषा वर्मा, मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी, जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे उपस्थित होते.

धरती आबा योजनेंतर्गत गावातील रस्ते, पिण्याचे पाणी, प्रत्येक घरात वीज, प्रत्येक घरात गॅस जोडणी, आरोग्य, शिक्षण, रोजगार, माता कल्याण, पोषण आहार अशा एकूण 25 योजना धरती आबा योजनेच्या माध्यमातून लागू करण्यात येणार आहेत. ज्या गावांमध्ये 500 पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या आहे तसेच ज्या गावात 50 टक्के पेक्षा जास्त आदिवासी समाज राहतो अशा गावांचा समावेश या योजनेंतर्गत करण्यात येणार आहे. राज्यातील पालघर, गडचिरोली यांसह इतर दोन जिल्हे आहेत. त्या जिल्ह्यामध्ये 50 आदिवासी लोकसंख्या असेल तरी ते गाव धरती आबा योजनेंतर्गत समाविष्ट करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले

वैयक्तिक पद्धतीमध्ये प्रत्येक व्यक्तीस तर सामूहिक पद्धतीमध्ये आदिवासी समूहाचा या योजनेमध्ये विचार करण्यात येणार असून 17 विभागाच्या 25 विविध योजना राबविल्या जाणार आहेत. या योजनेंतर्गत आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा मिळणार आहेत. आदिवासी समाजामध्ये धरती आबा योजनेमुळे परिवर्तन होणार असून आदिवासी समाजाचा विकास करण्यासाठी ही मोठी संधी आहे.

भगवान बिरसा मुंडा यांना धरती आबा असे म्हटले जात असे. पारतंत्र्याच्या काळामध्ये इंग्रज राजवटीविरुद्ध भगवान बिरसा मुंडा यांनी बंड करून आदिवासी समाजाला न्याय दिला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## प्रबोधन

# स्त्रियांना गुलाम । केले ज्या देशाने

Frailty thy name is woman, अर्थात चंचलते तुझे नाव स्त्री- हे जगप्रसिद्ध नाटककार शेक्सपियरच्या हॅम्लेटचे 'कु' प्रसिद्ध उद्गार इंग्रजी भाषेच्या अभ्यासकांना चांगल्या प्रकारे माहीत आहेत. म्हणजेच स्त्रियांची निंदा करण्यात जगातल्या सर्वच विदेशी आणि देशी शहाण्या लोकांत चांगलीच स्पर्धा लागलेली दिसून येते. संस्कृत विद्वान तर स्त्रियांच्या दुगुर्णांचा पाढाच वाचतो आहे. काय म्हणे, 'अनृतं (खोटारडेपणा), साहसं (दुःसाहस), माया (नाटकीपणा), मूर्खत्व (मूर्खपणा), मतिलोभ (लुब्ध होणे, पछाडून जाणे), अशौच्यं (घाणेरडेपणा), निर्दयत्वं (निर्दयपणा) हे सर्व दोष मिळून स्त्रीचा स्वभाव बनतो. मातृ देवो भव असा मातेचा म्हणजे पयार्याने एका स्त्रीचा गौरव देवी म्हणून करणाऱ्या समाजानेच स्त्रीला दूषणं देऊन बदनाम करावं, हे कितपत न्याय्य आहे?

आचार्य भागवतांनी स्त्रीच्या भूमिकेचा वेध घेऊन केवळ भारतीय समाजातीलच नव्हे, तर जागतिक पातळीवरील स्त्रीची मूलभूत कुचंबणा शब्दांकित केली आहे. पुरुषसंस्कृती विरुद्ध स्त्रीसंस्कृती यांच्यातील पारंपरिक शत्रुत्वाविषयी ते लिहितात, 'पुरुष कल्पनाशील तर स्त्री कृतिशील असते आणि दोघांचं जिच्यात सुंदर मीलन झालं आहे, अशी संस्कृती अजून निर्माण व्हायची आहे. पुरुषाला पराक्रम करून जय मिळवायचा आहे, तर स्त्रीला प्रेम मिळवायचं आहे. मनुष्याला आडवा पाडावा असं पुरुषाला वाटतं, तर पडलेला उभा कसा राहील, अशी काळजी स्त्रीला लागत असते. स्त्री-पुरुषातील हे सनातन युद्ध संपलेलं नाही. पण स्त्री पुरुषाचा अहंकार जागृत नाही करीत. त्या अहंकारापुढे आपला निभाव लागणार नाही, हे तिने ओळखलं आहे. म्हणूनच ती पुरुषाशी गनिमी काव्याने लढते. स्त्री सीता, तर पुरुष राम असतो; आणि पुष्कळ वेळा तो परशुरामही असतो. म्हणून स्त्री पुरुषाजवळ सरळ नाही बोलणार. आडपडद्यांनी, जणू तुमचं मतच आम्ही बोलतो, अशा युक्ती- प्रयुक्तीने ती बोलते.' भारतीय स्त्री जीवनाचा इतिहास लिहिला गेला, तर तो रूढ इतिहासातून फारच वेगळा, पण उद्बोधक होईल. पुरुषांचा इतिहास हा तलवारबाजी, लूट, जबरदस्ती आणि घमेंडीने भरलेला उन्मादी इतिहास आहे. पण स्त्रीजातीचा इतिहास शांतता, सहजीवन, ऐक्य, रचनात्मकता, विधायक दृष्टिकोन, मानवजातीचं संवर्धन- संगोपन यांचा असेल. जगाचं कल्याण पुरुषांच्या, जगज्जेत्यांच्या, सम्राटांच्या, हुकूमशहांच्या, हिंस्र जनावरांसारख्या चंगेझखान, नादिरशहा, हिटलर, स्टॅलिन यांच्या रक्तपिपासूपणाच्या गोष्टी वाचून होणं शक्य नाही. जगाचं कल्याण स्त्रियांनी जेव्हा राज्यकारभाराची सूत्रं हाती घेतली, तेव्हा मात्र बऱ्याच अंशी रक्तपात आणि संघर्ष टाळून राज्य केलं आहे, त्यासंबंधीचा इतिहास वाचून निश्चितपणे होईल.

आचार्य भागवतांच्या मते, 'राणी लक्ष्मीबाई आणि संन्यासिनी या दोन्ही स्त्रीमधील विकृती आहेत.' स्त्री संपूर्णपणे शोभते माता म्हणून. वात्सल्याने भरलेली, जीवनावर प्रेम करणारी. जे जे उत्पन्न होईल ते ते वाढावे, अशी जिची कल्पना ती माता सौजन्याची मूर्ती आहे. संस्कृती निर्माण करायची, तर ती मातारूपी स्त्रीच करू शकेल. पुरुषाने गेली ८००० वर्षे तयार केलेली संस्कृती व्यर्थ गेली आहे. युद्धपिपासू पुरुषांना स्त्रीने विरोध करताना मी जीव लावून वाढविलेली बाळे तुम्हाला युद्धात हकनाक मारता येणार नाहीत, असं ठणकावून सांगितलं पाहिजे.'

स्त्रियांनी वाल्या कोळ्याची बायको होऊन पुरुषांच्या पापकर्मात सहभागी व्हायचं नाकारलं पाहिजे. तरच वाल्या कोळ्याचं वाल्मिकी ऋषीत रूपांतर होईल. सामाजिक अशांती, भ्रष्टाचार, व्यसनाधीनता, अज्ञान अशा अनेक आघाड्यांवर दृढनिश्चय करून स्त्रिया जर आपल्या मनोधमार्नुसार कार्यरत झाल्या, तर समाजपरिवर्तन दूर नाही. म्हणूनच-

निंदू नका स्त्रीला । सांगती कबीर
जगाचा उद्धार । स्त्रीच्या हाती ॥ १
माता तीच आहे। महापुरुषांची
मानवजातीची । छाया तीच ॥ २
मातेविण नाही । कोणाचे अस्तित्व
माता महत तत्त्व। जगाचे या ॥३
जगाने स्त्रियांचा । केला न आदर
नुकसान फार । त्याने झाले ॥४
स्त्रियांना गुलाम । केले ज्या देशाने
गुलामीचे जिणे । भोगी तोच ॥५
पुरुषसंस्कृती । आहे संहारक
स्त्रीची संरक्षक। संस्कृती ती ॥६
जग सुरक्षित। राहील स्त्रीहाती
सुख आणि शांती । देई तीच ॥७
पुरुषांनो आता । स्त्रीला द्या नेतृत्व
जगा अमरत्व । लाभावया ॥ ८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# फ्लॅट देण्याच्या बहाण्याने एक कोटी तीन लाखांची फसवणूक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मजरेवाडी येथील इम्पिरिअर टॉवरमधील तीन फ्लॅट देण्याचे आमिष दाखवून एक कोटी तीन लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. याबाबत अनस बशीर शेख (वय 28, रा. रेल्वे लाईन, सोलापूर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

अब्दुलरशीद अब्दुलगणी बाडीवाले (रा. सम्राट नगर, मजरेवाडी, सोलापूर) व आसिफ इक्बाल नजीर सय्यद (रा. लुडस अपार्टमेंट, मोदी, सोलापूर) यांनी फिर्यादी अनस शेख यांच्याशी संपर्क साधला. मजरेवाडी येथील सर्व्हे क्र. 54/62 मधील इम्पेरिअर टॉवर येथे तीन फ्लॅट देण्याचे आमिष दाखविले. फ्लॅट नं. 501, 502 आणि 301 अनस शेख यांना देण्याचे ठरले. त्यासाठी अनस यांच्याकडून 2022 ते 2025 दरम्यान 92 लाख सहा हजार रुपये घेतले.

पैसे घेऊनही त्यांनी खरेदीखत करून दिले नाही. त्यानंतर बांधकामासाठी पैसे कमी पडत आहेत म्हणून पुन्हा 11 लाख 70 हजार रुपये घेतले. दरम्यान, पैसे देऊनही आरोपी फ्लॅट देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे अनस शेख यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अब्दुलरशीद अब्दुलगणी बाडीवाले व आसिफ इक्बाल नजीर सय्यद यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# कै. नामदेवराव जगताप उर्दू शाळेत पहिलीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** आज शाळेच्या पहिल्या दिवशी कै. नामदेवराव जगताप उर्दु शाळेत पहिलीच्या विद्याथीर्चे स्वागत माजी नगरसेवक संजय सावंत माजी नगरसेवक फारुक जमादार, रविंद्र कांबळे, दिपक सुपेकर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मजहर नालबंद, मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर आदी जणांनी गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले यावेळी पालक वर्ग शिक्षक उपस्थित होते.



कै.नामदेवराव जगताप ऊर्दू शाळा ही शंभर वर्षाहून अधिक काळापासून आहे, या शाळेत पहिली ते दहावी पर्यंतचे वर्ग असून चालु वर्षी दहावीची बॅच बाहेर पडली असून दहावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे. यावेळी प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, लिपिक शिवदास कोकाटे, शिक्षक पालक आदी जण उपस्थित होते. मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर यांनी आभार मानले.

# वाहनांच्या पाठीमागे बसविलेल्या सायकल कॅरीअरवर कारवाई नाही

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** वाहनांच्या पाठीमागे इतर वाहनांना कोणत्याही प्रकारे अडचण, अडथळा निर्माण होणार नाही, अशा प्रकारे बसविण्यात आलेल्या सायकल कॅरीअरद्वारे वाहून नेत असल्यास, अशा वाहनांवर यापुढे कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येऊ नये, असे परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

पर्यावरणास अनुकूल, व्यायामाचे एक साधन त्याचप्रमाणे कोणत्याही भागाच्या शेवटच्या स्थानापर्यंत सहज जाता येते. याकरीता जगातील अनेक देशांमध्ये बरेचजण वाहनाचा वापर न करता सायकलचा वापर करत असतात, याकरीता बरेचसे वाहनधारक आपल्या वाहनाच्या पाठीमागे सायकल कॅरीअर बसवून त्याचा वापर सायकल वाहून नेण्यासाठी करत असतात. आपल्या देशातही वाहनधारक वाहनाच्या पाठीमागे सायकल कॅरीअर बसवून सायकल वाहून नेताना आढळतात.

## वात्रटिका

### अपघात मालिका

अस्वस्थ महाराष्ट्रात
मरणही स्वस्त झाले...
कोणी धडकून कोणी
पूल कोसळून मेले...
रोज रोज नव्या घटना
नक्कीच घडत आहेत...
कोणी हुंदके देऊन, कोणी
ओक्साबोक्शी रडत आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# जि.प. प्राथमिक शाळा बिजवडी येथे विद्यार्थी प्रवेशोत्सव उत्साहात



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभाला शाळांमध्ये उत्साहाचे वातावरण असते. नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत आणि त्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि आनंदाचा क्षण असतो. अशाच प्रकारचा विद्यार्थी प्रवेशोत्सव आज दिनांक १६जून २०२५ रोजी आमच्या जि.प.प्राथमिक शाळा,रावबहाद्दूर गट शाळेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

आज शाळा रंगीबेरंगी फुलांच्या माळांनी व फुग्यांनी आकर्षक सजवली गेली होती. सर्व शिक्षक व मुख्याध्यापक विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे स्वागत करण्यासाठी सज्ज होते. कार गाडीतून विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. नवीन विद्यार्थ्यांचे गुलाबाचे फुल देऊन स्वागत करण्यात आले. इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या नवागतांचे पहिले पाऊल म्हणून पावलांचे ठसे घेण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. आशाताई भजनावळे व उपाध्यक्षा सौ. दिपाली लोखंडे आणि पालक यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके तसेच गणवेश वाटप करण्यात आले विद्यार्थ्यांना बूट व सॉक्स चे वाटप देखील करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत राऊत यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांनी शाळेच्या यशस्वी परंपरेचा व आगामी वर्षाच्या योजनांचा आढावा दिला.

विद्यार्थी प्रवेशोत्सव हा फक्त स्वागताचा कार्यक्रम नसून तो विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारा, शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टी देणारा एक प्रेरणादायी क्षण असतो. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आत्मीयता व आपुलकी निर्माण होते. असे मत शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत राऊत यांनी मांडले.

सर्व विद्यार्थी व पालक यांना गोड खाऊ म्हणून जिलेबी वाटप करण्यात आली.

सदर कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा आशा भजनावळे, दिपाली लोखंडे, रोहिणी बंडलकर, सुवर्णा कांबळे, पूजा बोडरे, रतन बंडलकर, शहनाज नदाफ, पूजा ढोबळे, राधा भजनावळे, अश्विनी गरुड उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक अजमीर फकीर यांनी केले.मुख्याध्यापक श्रीकांत राऊत यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

# मोदी सरकारचा कार्यकाळ देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहीला जाईल - चेतनसिंह केदार सावंत

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** विकसित भारत, आत्मनिर्भर भारत आणि संकल्प से सिध्दी या मंत्राने मोदी सरकारचा कालखंड ओळखला जाईल. ११ वर्षाच्या प्रवासात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या उज्वल भविष्याची पायाभरणी केली. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्याने विकासाला गती मिळाली आहे. जेथे भाजपा सरकार सत्तेत आहे त्या ठिकाणी गरीबांचा विकास झाला आहे. सरकार म्हणजे सेवा, या हेतूने काम केले जात असल्याने सुशासन ही देशाची संस्कृती बनली आहे. विकसित भारताचा अमृतकाल, सेवा, सुशासन, गरीब कल्याणाची ११ वर्षे यामुळे मोदी सरकारचा कार्यकाळ देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहीला जाईल असे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

मोदी सरकारच्या ११ वर्षाच्या कार्यकाळातील विकासाच्या दृष्टीने भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, गेल्या ११ वर्षात भारताने अमृत काळात विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. २०१४ पूर्वी सामान्य माणूस, अधिकारी हे कसे शक्य आहे, हे शक्यच नाही, असे म्हणत असे, आता गेल्या ११ वर्षातील मोदी सरकारने केलेली कामे बघता, होय, हे शक्य आहे, हे झालेच पाहिजे, मोदी सरकार असल्यामुळे हे नक्कीच होणार, असे सामान्य माणूस मोठ्या विश्वासाने म्हणून लागला आहे. मोदी सरकारने भारतीय राजकारणात कार्यक्षमतेचे राजकारण हा नवा शब्दप्रयोग प्रत्यक्षात आणला आहे. आपण जनतेला जबाबदार आहोत, हे लक्षात ठेऊन मोदी सरकारने कारभार केला आहे. सरकारी कारभारात पारदर्शकता आणून, वेगवेगळ्या सुधारणा करून मोदी सरकारने आपल्या नव्या संस्कृतिचा परिचय दिला आहे. २०१४ पूर्वी देश भ्रष्टाचाराने पोखरला होता. देशात अनेक घोटाळे घडत होते.



देशात लांगुलचालनाचे राजकारण सुरू होते. मोदी सरकारने मात्र देशात विकासाचे युग सुरू केले.

२०१४ पूर्वी सरकारी योजनांचे लाभ लाभार्थी जनतेपर्यंत पोहचत नसत. लाभार्थी जनतेला हे लाभ मिळविण्यासाठी मध्यस्थांकडे जावे लागे. मोदी सरकारने डीबीटी प्रणालीचा वापर करत सामान्य माणसाच्या थेट बँक खात्यात लाभ पोहचवण्याचे काम केले आहे. सामान्य माणसाला वैद्यकीय उपचारावर केल्या जाणाऱ्या खचार्ची भिती वाटत असे. मोदी सरकारने ५ लाखापर्यंतचे वैद्यकीय उपचार आयुष्मान भारत योजनेअंतर्गत मोफत उपलब्ध केले आहेत. मेक इन इंडियामुळे अनेक वस्तू आणि सेवांची निर्यात करत आहोत. आता आपण जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनलो आहोत. चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याकडे भारताची वाटचाल सुरू आहे.

गेल्या ११ वर्षात सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या संकल्पनेनुसार राज्य कारभार होत असल्यामुळे प्रत्येक नागरिक याचा साक्षीदार ठरला आहे. भारताच्या विकासाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतःकडे घेतले नसून १४० कोटी भारतीयांना याचे श्रेय दिले आहे. ऑपरेशन सिंदूरमुळे सुरक्षित भारत, समृध्द भारत या मंत्राचा परिचय जगाला झाला आहे. भारतावर दहशतवादी मार्गाने हल्ला चढविला तर, दहशतवाद्यांच्या देशात घुसून जशास तसे उत्तर दिले जाईल, हे ऑपरेशन सिंदूरमुळे जगाला कळले आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतात बनवलेल्या शस्त्रास्त्रांनी, क्षेपणास्त्रांनी मोठी कामगिरी बजावली आहे. भारतात तयार केलेल्या शस्त्रास्त्रांची पाकिस्तानात यशस्वी चाचणी झाल्यामुळे भारतात बनवलेल्या संरक्षण उत्पादनांची विश्वासार्हता जगात तयार झाली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील गरीबीचे पूर्णपणे उच्चाटन करण्याची प्रतिज्ञा केली आहे. गरीब कल्याण अन्न योजना, उज्वला योजना, आवास योजना, जलजीवन मिशन, जनधन योजना, आयुष्मान भारत, किसान सन्मान निधी अशा अनेक योजना यशस्वीपणे राबविल्या जात आहेत. मोदी सरकारच्या काळात जनता भ्रष्टाचारमुक्त कारभाराचा अनुभव घेऊ लागली आहे. राम मंदिर निर्मिती, काशी विश्वनाथ कॉरीडॉरमुळे मोदी सरकार विकासाबरोबरच देशाची गौरवशाली संस्कृती जपण्याला प्राधान्य देत आहे, हे दिसले आहे. जीएसटी सारख्या करामुळे व्यवस्थेतील भ्रष्टाचार संपला आहे. ३७० कलम रद्द झाल्यामुळे देशाची अखंडता बळकट झाली आहे. सेवा, सुशासन, गरीब कल्याण या संकल्पना कृतीत आणून मोदी सरकारने राज्य कारभार कसा करावा, याचा आदर्श स्थापित केला असल्याचे भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.

# शिवरायांच्या मंदिरास निधी कमी पडणार नाही - आ.विजयकुमार देशमुख

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री अंबिका माता मंदिर, तोडकरी वस्ती, बाळे येथे बांधण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराचे भूमिपूजन शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. या छत्रपती शिवरायांच्या मंदिरास निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही आमदार विजयकुमार देशमुख व शिवसेना शिंदे पक्षाचे जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे यांनी दिली.

निधी अभावी बाळे येथील छत्रपती शिवरायांच्या मंदिराचे काम रखडले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना शिंदे पक्षाचे अध्यक्ष अमोल शिंदे



यांनी व शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांनी या मंदिरासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. या मंदिरातून छत्रपती शिवरायांच्या विचारांचा जागर होईल. सर्व समाजासाठी हे मंदिर प्रेरणादायी ठरेल व हे भवन सर्वांसाठी खुले असले पाहिजे असा मानस अमोल शिंदे यांनी व्यक्त केला. याप्रसंगी राजन जाधव, विनोद भोसले, राजू आलूरे, विनय ढेपे, आबा सावंत, आनंद भवर, सुनील भोसले यांच्यासह बाळे परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# हराळवाडीत पहिलीच्या विद्यार्थ्यांचे बैलगाडी आणि फोर व्हीलर वाहनातून प्रवेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हराळवाडी येथे पहिलीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत पारंपरिक पद्धतीने बैलगाडीतून आणि आधुनिकतेची कास धरत चार चाकी वाहनातून करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हराळवाडी येथे शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव आनंदाने व उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांची सुंदर सजवलेली बैलगाडीतून व फोरव्हिलर मधून मिरवणूक काढण्यात आली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कडून आलेल्या विद्यार्थ्यांना आकर्षक टोप्या व मुखवटे घालून त्यांचे स्वागत करण्यात आले.औक्षण करून त्यांचे पाऊलांचे ठसे घेण्यात आले व त्याची एक प्रत पालकांना देण्यात आली.

याप्रसंगी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना



मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, मोफत लेखनसाहित्य, बुट व सॉक्स तसेच ओळखपत्र वाटप करण्यात आले.या प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे औचित्य साधून शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रंगनाथ गावडे, ग्रामपंचायत उपसरपंच लिंगराज व्हनमाने, सामाजिक कार्यकर्ते.पै.माऊली हेगडे, प्रधान धोडमिसे, हैबत शेळके, व माता पालक मायाबाई माडकर, सावित्रीबाई माडकर, सोनाली चवरे, कविता माने उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक कविता फुटाणे व शिक्षक सचिन शिंदे, शंकर पाटील, संतोष माळगोंडे, सचिन निरगिरे, संजय ननवरे, पद्मसिंह वरडे, यांनी परिश्रम घेतले.तर मोहोळ तालुक्यातील शिक्षण विस्तारधिकारी अतुलकुमार माने यांनी हराळवाडीतील जि.प.प्रा.शाळेला भेट दिली.

# सा.ना.जगताप मुली नं.१ शाळेत प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न



**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात पीएमश्री- साधनाबाई नामदेवराव जगताप प्राथमिक मुलींची शाळा नं.१ नगर परिषद, करमाळा या शाळेत शाळा प्रवेश उत्सव कार्यक्रमानी झाली. इयत्ता पहिलीतील नवीन प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनींचे गुलाबपुष्प, चॉकलेट, फुगे देवून, फुलांचा वर्षाव करत मोठ्या उत्साहात स्वागत केले. शाळेने विद्यार्थिनींच्या स्वागतासाठी आकर्षक रंगरंगोटी रांगोळी कार्टून, फुग्यांची सजावट, सेल्फी पॉईंट करून आनंदायी वातावरण निर्माण केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक अतुल फंड तर प्रमुख उपस्थितीत शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. निर्मला फंड, उपाध्यक्षा सौ. आम्रपाली कांबळे, शिक्षण तज्ज्ञ सदस्या सौ.माधुरी पवार, सौ.शितल माने, सौ. दिपाली बोकन, सौ.प्रियंका भुसारे, सारंग परदेशी उपस्थित होते.

प्रवेशोत्सव कार्यक्रमा अंतर्गत सर्व मुलींना मान्यवरांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश व शूज सॉक्स वाटप केले.

शाळेचे मुख्याध्यापक दयानंद चौधरी यांनी कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात शाळेची गुणवत्ता, शाळेने केलेल्या प्रगतीची माहिती दिली.

प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रकांत वीर यांची मुलगी व शाळेची माजी विद्यार्थिनी गायत्री वीर हिच्या स्मरणार्थ डॉ. वीर यांनी विविध स्पर्धा परीक्षेतील राज्य गुणवत्ता यादीतील आराध्या बरीदे, मधुरा बागल, अनन्या पवार, श्रावणी खराडे, तन्मयी चोपडे, शरयू फरतडे, जिल्हा गुणवत्ता यादीतील राजमुद्रा सुरवसे, अंशिका पाटील, समृद्धी साडेकर या सर्व मुलींना प्रत्येकी 500/- रु रोख व केंद्र गुणवत्ता यादीतील काव्यांजली करचे, ओवी माहुले, पूर्वा घोलप, आरोही घुमरे, आराध्या फंड, भाग्यश्री घोलप, संघर्षा कांबळे, आरोही खरात, मनवा उकिरडे, गौरवी जगदाळे, आरसीन बागवान यांना प्रत्येकी 300/-रु रोख रक्कम बक्षीस दिले. सर्व मान्यवरांनी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन केले सर्व मुलींना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संध्या शिंदे यांनी केले. उपस्थित सर्वांचे आभार सौ.मोनिका चौधरी यांनी मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व इयत्तेतील मुलींची उपस्थिती लक्षणीय होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक रमेश नामदे, निलेश धर्माधिकारी, निलेश भुसारे, सौ. सुवर्णा वेळापुरे , सौ.सुनिता क्षीरसागर, श्रीम.तृप्ती बेडकुते, श्रीम. भाग्यश्री पिसे, श्रीम. योगिनी चवरे आदींनी परिश्रम घेतले.

# श्राविका क.महाविद्यालयात गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उमाबाई श्राविका कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष 2025 ची सुरुवात विद्यार्थिनींना गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. उमाबाई श्राविका महविद्यालयाचे प्राचार्य सुकुमार मोहोळे यांच्या शुभहस्ते इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींना प्राचार्यांनी मार्गदर्शन करताना त्यांनी कॉलेजची शिस्त नियम यांची माहिती दिली. त्याचबरोबर अभ्यासातील नियमितपणा वेळ व अभ्यासातील सातत्य यावर भर देण्यास सांगितले. यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गणेश लेंगरे यांनी केले तर आभार प्रा.अविनाश मुळकुटकर यांनी मानले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा कंगळे यांनी केले यावेळी या कार्यक्रमास प्रा.अर्चना कानडे प्रा. सोमनाथ राऊत प्रा ज्योती बांगर प्रा. प्राजक्ता काळे प्रा.कल्याणप्पा हायगोंडे तसेच महाविद्यालयीन विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# जगन्नाथ भोसले यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालूका भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचारी जगनाथ भोसले यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार करण्यात आला. जगनाथ भोसले यांनी २० वर्ष भारतीय सेनादलात नोकरी करून हवालदार पदावरून ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेव्दारे भूमी अभिलेखमध्ये नोकरी केली. त्यांनी पंढरपुर, माळशिरस यैथील भुमी अभिलेख कार्यक्रमात १८ वर्ष नोकरी माळशिरस येथे ते सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांचा अधिकारी व कर्मचारी यांनी सन्मान केला.

याप्रसंगी संजय मडके उपाधीक्षक भूमि अभिलेख माळशिरस, सादिक सय्यद शिरिस्तेदार, शिवाजी लवटे सरपंच मेडद, गणेश शिंगारे, दीपक नवले, आनंद साळुंखे, जितेंद्र महावरकर, प्रशांत पाटील, बाळासाहेब धडस, मिलिंद धाईंजे, विद्याधर कांबळे,जाधव,शेख, मुरमुरे चव्हाण, उपस्थित होते.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## अकलूज नगरपरिषद,अकलूज

ता, माळशिरस.जि.सोलापूर (महाराष्ट्र)
फोन - (०२१८५) २२०३५,२२५९२
Gmail-comcakluj21@gmail.com
स्थापना दिनांक ०३-०८-२०२१


जा.क्रं./४७६/अनप/विवि/२०२५ दिनांक :-१६/०६/२०२५

**जाहीर निविदा सूचना**
**विद्युत विभाग**

आषाढी वारी पालखी सोहळा २०२५ अकलूज नगरपरिषद हद्दीतील पथदिव्यांवर सुशोभिकरणाकरिता LED लायटिंग व इतर विद्युत विषयक कामे करणे या कामासाठी जाहिर निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा सूचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्रके निविदा फॉर्म इत्यादी माहिती अकलूज नगरपरिषदेच्या विद्युत विभागामध्ये उपलब्ध होईल. निविदा सादर करण्याची मुदत दिनांक :- १७/०६/२०२५ ते २४/०६/२०२५ सायंकाळी ०४:०० पर्यंत राहील.

सही/-
(दयानंद गोरे)
मुख्याधिकारी
अकलूज नगरपरिषद,अकलूज

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) सलमान खान, माधुरी दीक्षित अभिनीत एक चित्रपट २) सासरच्या विरूध्दार्थी ३) दिव्यातील प्रकाशमय वात ४) श्रीरामाचा जन्मदिवसाचा उत्सव ५) सूर्य, एक नाव ६) घड्याळ (हिंदीत) ९) भारतीय क्रिकेट टीममधील एक फलंदाज ११) आई (इंग्रजीत) १२) विषमच्या विरूध्दार्थी १३) नातेवाईक १८) झी मराठीवरील एक विनोदी मालिका-** हवा येऊ द्या २०) कंबर (इंग्रजीत) २१) सलमानच्या भावाचे नाव २२) झाड, वृक्ष २३) एक शेंगभाजी २५) गुलाबाच्या पाकळ्यांचा मुरांबा २६) मनसे अध्यक्षांचे फक्त नाव २८) शंभर धावा, सेंच्युरी ३०) तमाशातील कलावंत ३१) घर बांधकामासाठी वापरतात ती आयताकृती तुकडा ३३) सैन्याचा प्रमुख ३४) मत्स्य ३५) ऐश्वर्या राय अभिनीत एक हिंदी चित्रपट ३६) आकाशातील तारा (हिंदीत) ३७) थरथरणे ३९) रात्र (हिंदीत) ४०) वरचढ, श्रेष्ठ ४३) भारतीय क्रिकेट समालोचक -** शास्त्री ४५) एक म्हण-दाम करी ** ४६) पाच+दोन

**आडवे शब्द :** १) बजीरंगबलीचे एक नाव
३) मध्यप्रदेशचे युवा नेते -***** शिंदे
७) शिजविलेला तांदूळ
८) चित्त, बहिणाबाईंची एक कविता- ** वढाय वढाय
९) सिगारेटप्रमाणे तंबाखू टाकून बनविलेली एक वळी १०) आंब्याचा रस
१३) शीख धर्मियांचे एक गुरू ***
१४) अधिकाराचे स्थान, कवितेतील पद्य, पाऊल १५) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे १६) तोपर्यंत (ग्रामीण भाषेत) १७) स्पर्श (इंग्रजीत)
१९) दक्षिणेकडील राज्य २०) कलम केलेले २१) महाराष्ट्रातील एक जिल्हा
२२) मनाची तळमळ २४) अकरा (इंग्रजीत) २५) आठवड्यातील एक वार
२७) पोरकट, लहान मुलासारखे वर्तन २९) आश्चर्य
३०) पर्यायी केलेली व्यवस्था ३२) श्रीकृष्णाचा मामा
३४) आईचा भाऊ ३५) दुधापासून बनविलेले एक पेय ३६) एक हिंदी चित्रपट - जो जिता वही **** ३८) पतीचे वडील ४०) मनाला लागून राहिलेली खंत ४१) उष्मा, त्रास ४२) दरवाजा ४४) गीत रचणारा ४७) शेत ४८) शालेय सुट्टीचा वार ४९) विचारविनिमय, सल्ला****

## सुडोकु - 277

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 6 | 8 | 7 | | 4 | |
| | 2 | | | | 3 | | 6 | |
| 6 | | | 2 | 5 | | 1 | | 7 |
| 1 | 3 | | | | | | | 5 |
| 5 | | | | | 2 | 7 | 3 | |
| 7 | 6 | 4 | | 3 | 8 | | | 9 |
| | | | 3 | | | | 2 | 6 |
| | 5 | 6 | | | 1 | 4 | 7 | 3 |
| | 4 | | 7 | 2 | | | | 1 |

# अक्कलकोट नगरपरिषदेत आता २३ ऐवजी २५ सदस्य असणार



**अक्कलकोट (काटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाने नुकतेच नगरपरिषदेच्या प्रभाग रचनेबाबत आदेश जारी केले आहेत. त्यानुसार प्रशासन कामाला लागले असून अक्कलकोट नगरपरिषदेच्या नव्या प्रभाग रचनेत आता २३ ऐवजी २५ नगरसेवक असणार आहेत. नव्याने एक प्रभाग वाढणार असून २०२२ ची प्रभाग रचना मात्र कायम राहणार आहे.

अक्कलकोट नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीवरून प्रशासकीय व राजकीय हालचालींना वेग आला आहे. नागरिकांचेही प्रभाग रचनेकडे लक्ष लागले आहे. आगामी निवडणुकीतील गणिते ही नव्याने वाढलेल्या प्रभागावर अवलंबून राहणार आहेत.

अक्कलकोट नगरपरिषदेत २०१६ मधील प्रभाग रचनेनुसार एकूण ११ प्रभाग होते. प्रत्येक प्रभागातून दोन नगरसेवक याप्रमाणे व शेवटच्या प्रभागात तीन असे एकूण २३ नगरसेवक होते. याशिवाय २ स्वीकृत नगरसेवक आणि जनतेतून थेट निवडलेला एक नगराध्यक्ष अशी मिळून नगरपरिषदेच्या सदस्यांची एकूण संख्या २६ अशी होती. त्यावेळी एका प्रभागातील सरासरी मतदार संख्या १७०० ते १८०० होती. २०२२ मध्ये नवीन प्रभाग रचना करण्यात आली होती व त्यास जिल्हाधिकारी यांची मंजुरी मिळाली होती. मात्र, ओबीसी आरक्षणाचा विषय न्यायप्रविष्ट झाल्याने निवडणुकाच झाल्या नाहीत. वारंवार निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या. आता सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश दिल्याने शासनाने नव्याने प्रभाग रचनेचे आदेश दिले आहेत. मात्र, अक्कलकोट नगरपरिषदेत २०२२ प्रमाणेच सदस्य असणार असून प्रभाग मात्र एकने वाढणार आहे.

नव्या रचनेत जुन्या प्रभागांचे विभाजन होणार असून एकूण प्रभागांची संख्या, नगरसेवकांचे प्रमाण व वॉर्डनिहाय सीमारेषा नव्याने निश्चित होणार आहेत. मतदारसंख्या आणि वस्ती नकाशा लक्षात घेता अनेक जुन्या प्रभागांचे विभाजन किंवा एकत्रिकरण होण्याची शक्यता आहे. यामुळे काही इच्छुकांच्या आशेवर पाणी पडणार आहे.

राजकीयदृष्ट्या अक्कलकोट-मध्ये दोन प्रमुख गट आहेत. भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी व काँग्रेसचे माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या भोवतीच तालुक्याचे राजकारण फिरत असते. आता माजी मंत्री म्हेत्रे हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत गेले असून भाजपची शिंदेसेनेसोबत युती आहे. तसेच काँग्रेसचे महत्त्वाचे नेते मल्लिकार्जुन पाटील, अश्पाक बळोरगी हे काँग्रेसमध्येच थांबले आहेत. वंचित बहुजन आघाडी, मनसे, आरपीआय, शिवसेना उबाठा पक्षाचे नेतेही सक्रिय झाले आहेत. काँग्रेस आणि इतर पक्षात आघाडी होते का हे पाहावे लागणार आहे. नगरसेवकांमधून नगराध्यक्ष निवडला जाणार असल्याने चुरस निर्माण झाली आहे.

**१२ प्रभाग असणार**

प्रभाग रचना प्रसिध्द होत नाही, तोपर्यंत ती गोपनीय असेल. अक्कलकोट नगरपरिषदेत २५ सदस्य असतील. प्रत्येकी २ सदस्य असणारे ११ प्रभाग व ३ सदस्य असणारा १ प्रभाग असे एकूण १२ प्रभाग असतील, असे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी सांगितले.

**२०१६ मधील पक्षीय बलाबल**

- भाजप नगराध्यक्षांसह – १६
- काँग्रेस – ६
- राष्ट्रवादी – १
- अपक्ष – १
- एकूण – २४

**नगरपरिषद प्रभाग रचनेचे वेळापत्रक**

- प्रगणक गटाची मांडणी करणे ११ ते १६ जून
- प्रारूप प्रभाग रचना तयार करणे १७ ते १८ जून
- स्थळ पाहणी १९ ते २३ जून
- गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे २४ ते २६ जून
- निश्चित केलेल्या प्रभाग हद्दी तपासणे १ जुलै ते ३ जुलै
- प्रारूप प्रभाग रचना तयार करणे ४ ते ७ जुलै
- प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करणे व हरकती २२ ते ३१ जुलै
- हरकतींवर सुनावणी १ ते ११ ऑगस्ट
- निवडणूक आयोगास पाठविणे १२ ते १८ ऑगस्ट
- अंतिम प्रभाग रचना प्रसिध्दी २९ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर

# बार्शी तालुक्यातील ढाळे पिंपळगाव प्रकल्प ओव्हर फ्लो



**वैराग (काटूसत्य वृत्त):-** मान्सूनपूर्व वादळी वाऱ्यासह सुरु झालेल्या जोरदार पावसामुळे व मान्सून पावसाच्या जोरदार बॅटिंगमुळे बार्शी तालुक्यातील ढाळे पिंपळगाव मध्यम प्रकल्पनुकताच ओव्हर फ्लो होऊन वाहू लागला आहे. वैराग भागाची तहान भागवणारा हिंगणी ९२ टक्के तर जवळगाव मध्यम प्रकल्प ५५ टक्के भरला आहे. भोगावती, नागझरी, नीलकंठ नद्या सध्या जोरात वाहू लागल्या आहेत. त्यामुळे राहिलेली दोन्ही धरणे मोठा पाऊस झाल्यास लवकरच भरणार आहेत.

या धरणांतील पाण्याचा लाभ वैराग भागातील शेती व पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात होतो. गेल्या काही दिवसात संततधार व दमदार पडणाऱ्या पावसामुळे प्रकल्पांतील पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत असल्याने शेतकरी वगार्तून आनंद व्यक्त होत आहे.

ढाळे. पिंपळगाव मध्यम प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ४४७ द.ल.घ.फू. असून मृतसाठा २.८० द.ल.घ.फू. इतका आहे. सध्या हे धरण पूर्ण क्षमतेने १०० टक्के भरून ओव्हर फ्लो होऊन वाहत आहे. धरणातील पाण्याचा लाभ या भागातील ढाळे पिंपळगाव, महागाव, मळेगाव, बावी, तांदूळवाडी, साकत, पानगाव, कळंबवाडी, पिंपरी, काळेगाव, घाणेगाव, चिखर्डे या भागातील शेतकऱ्यांच्या रब्बी पिकासाठी होणार आहे. या धरण क्षेत्र परिसरात हजारो एकर बागायती क्षेत्र वाढले असून द्राक्षबागा, ऊसशेती, सीताफळ, लिंबोणी तसेच इतर बागायती व जिरायती पिकांना यामुळे मोठा फायदा होणार आहे.

धाराशिव, तुळजापूर व वैराग भागात गेल्या काही दिवसात दमदार व संततधार पाऊस झाल्याने शेती व पिण्याच्या पाण्यासाठी वरदान असणाऱ्या हिंगणी व जवळगाव मध्यम प्रकल्पामधील पाणी पातळीत मोठी वाढ होत आहे. असाच आणखी काही दिवस पाऊस पडला तर दोन्ही प्रकल्प लवकरच भरतील. हिंगणी मध्यम प्रकल्पाची एकूण पाणी साठवण क्षमता १६०७ द.ल.घ.फू. इतकी असून मृतसाठा पाणीपातळी ४७८ द.ल.घ.फू. आहे. सध्या या प्रकल्पामध्ये ९२ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे.

तर जवळगाव मध्यम प्रकल्पाची एकूण पाणी साठवण क्षमता १२०० द.ल.घ.फू. इतकी असून मृतसाठा पाणी पातळी २०० द.ल.घ.फू. इतकी आहे. सध्या या प्रकल्पामध्ये ५५ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. सध्या हिंगणी व जवळगाव मध्यम प्रकल्प धरण क्षेत्रात सतत पाऊस पडत असल्याने व दोन्ही नद्या वाहत असल्याने लवकरच हे मध्यम प्रकल्पदेखील भरतील, असा अंदाज वर्तविला जात आहे.

भोगावती नदीवरील असणारे हिंगणी मध्यम प्रकल्प व नागझरी नदीवरील जवळगाव मध्यम प्रकल्प जनसामान्यांसाठी संजीवनी ठरले आहेत. दोन्ही प्रकल्पातील पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत असल्याने शेतकरी वर्गातून आनंद व्यक्त होत आहे.


**नागरिकांनी दक्षता घ्यावी**

सध्या मान्सून पाऊस सुरू असून यावर्षी प्रथमच मध्यम प्रकल्प लवकर भरत आहेत. नदी व धरणातील पाणी पातळीत वाढ होत आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावातील नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन बार्शी पाटबंधारे उपविभागाचे उपविभागीय अभियंता विराज परदेशी यांनी केले आहे..

**बार्शी तालुक्यातील पाणीसाठा पुढीलप्रमाणे :**

१५ जून रोजी सकाळपासून बार्शी तालुक्यातील घाणेगाव, इर्लें, तडवळे, देगाव, डिसकळ, भोईरे हे लघू पाणलोट तलाव भरून वाहत आहेत. तर ममदापूर–६० टक्के, गोरमाळे–५३ टक्के, कारी– ६१ टक्के, वैराग– १०० टक्के, तावडी– ६२ टक्के, कळंबवाडी– १९ टक्के, चारे– ३२ टक्के, वालवड – ०२ टक्के, लाटेगाव– २० टक्के, कोरेगाव– ३२ टक्के, पाथरी– २९ टक्के, शेलगाव– २३ टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला आहे.

# बाजार समितीत शेतकऱ्यांना सुविधा द्याव्या



**मंद्रूप (काटूसत्य वृत्त):-** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अन्यथा शेतकरी बांधवांना सोबत घेऊन बाजार समितीसमोर मोठे आंदोलन छेडू, असा इशारा श्री बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे यांनी दिला आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार रसमिती ही राज्यातील तिसऱ्या न क्रमांकाची मोठी बाजार समितीं म्हणून ओळखली जाते. या बाजार समितीची वार्षिक उलाढाल दोन हजार कोटींपेक्षा जास्त आहे. इतकी मोठी बाजार समिती असताना ज त्या मानाने शेतकऱ्यांसाठी मात्र, कोणत्याच सोयीसुविधा उपलब्ध त नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला योग्य भाव मिळत नाही. त्यांचा कृषी माल चोरीस जातो, यासह अनेक समस्या व त्रास शेतकरी. बांधवांना सहन करावा लागत आहे.

यावेळी हत्तुरे म्हणाले, बाजार समितीमध्ये मोठी आर्थिक उलाढाल होते, दरवर्षी बाजार समिती कोट्यवधी रुपये कमावते, ज्यांच्या जीवावर हे उत्पन्न मिळते त्या अन्नदात्या शेतकरी बांधवांना कोणत्याच सुविधा बाजार समितीत मिळत नाहीत.

बाजार समितीत कृषी माल घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांना मुक्काम करण्यासाठी शेतकरी भवन नसल्यामुळे ते बाजार समितीच्या आवारात थंडीत, पावसात भिजत पोत्यावरच झोपतात. कृषी माल साठवून ठेवण्यासाठी शीतगृह अद्ययावत केले जात नाही. शेतकरी बांधवांना, दर्जेदार जेवण मिळत नाही. पिण्यास स्वच्छ पाणी व आंघोळीसाठी गरम पाणी मिळत नाही. शौचालयाची चांगली सुविधा उपलब्ध नाही. बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना भौतिक सुविधा मिळत नाहीत. बाजार समितीत प्रचंड अस्वच्छता आहे. बाजार समितीत अतिक्रमण झाल्याने कृषिमाल आणताना शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. काही शेतकऱ्यांना वेळेवर कृषिमाल विक्रीचे पैसे दिले जात नाहीत. यासह अनेक प्रश्न शेतकरी बांधवांचे आजही तसेच आहेत. बाजार समितीवर प्रस्थापित नेतेच निवडून जातात. ते शेतकरी प्रश्नाकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे वर्षानुवर्षे हे प्रश्न सुटताना दिसत नाहीत. आठ दिवसांत शेतकरी बांधवांचे प्रश्न मार्गी न लावल्यास सोलापूर बाजार समिती समोर शेतकरी बांधवांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेड़, असा इशारा त्यांनी शेवटी बोलताना दिला.

# आषाढी वारी अनुषंगाने सोलापूर जिल्हा अधिकारी कार्यालय यांच्याकडून आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** आषाढी वारी अनुषंगाने सोलापूर जिल्हा अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली व सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्या नेतृत्वाखाली माळशिरस तालुक्यातून महाराष्ट्र कमांडो फाउंडेशन संचलित रेस्क्यू कमांडो फोर्स मधील कमांडो यांना कोलाड (रायगड) या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापनाच्या बारा दिवसाच्या प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले आहे. यावेळी नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी कोलाड (रायगड) येथे प्रशिक्षणासाठी निघालेल्या बसचे पूजन करून प्रशिक्षणासाठी निघालेल्या कमांडो व आपदा मित्र यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या व हिरवा झेंडा दाखवून प्रशिक्षणार्थ्याची बस रवाना करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र कमांडो फाउंडेशनचे अधिकारी मनोज राऊत, यश करिअर अकॅडमीचे अनिल माने तसेच कमांडो व अपदा मित्र उपस्थित होते. या प्रशिक्षणामध्ये आत्मविश्वासाने, व्यापकपणे संकटांना तोंड देण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांना सक्षम बनवले जाते प्रशिक्षणामध्ये आपत्कालीन नियोजन, पूर यंत्रण, जोखीम मूल्यांकन, प्रथमोपचार, सीपीआर, शोध आणि बचाव कौशल्य अशा प्रकारचे प्रशिक्षण दिले जात असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूरचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्ती सागर ढोले यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज राऊत यांनी केले असून आभार सुनील माने यांनी मानले.

# नातेपुते येथील श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्रशालेमध्ये प्रवेशोत्सव साजरा



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते येथील श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्रशालेमध्ये सोमवार दिनांक १६ जून रोजी प्रशालेचे मुख्याध्यापक,सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांच्या हस्ते फीत कापून प्रवेशोत्सव संपन्न झाला. प्रशालेचे मुख्याध्यापक विजय उबाळे यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देऊन प्रशालेमध्ये विविध प्रकारचे उपक्रम साजरे केले जातात आणि विद्यार्थी कसा सर्वगुण संपन्न होईल याची काळजी प्रशालेतर्फे घेतली जात असल्याचे सांगितले. तसेच नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षकांचा स्वागत करून त्यांचा सन्मान करण्यात आला. पालकांच्या हस्ते उपस्थित विद्यार्थ्यांना पुस्तके व खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊ वनवे यांनी केले असून आभार गणेश नरळे यांनी मानले यावेळी कार्यक्रमासाठी पालक आप्पादनाने सतीश काळे संजय करे पल्लवी कांबळे सलमा मोगल फरीदा नदाफ तसेच शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# गोयेगाव - आगोती पुलाच्या अंतिम सर्वेक्षणास सुरुवात

**शेतकऱ्यांमधून आनंदाचे वातावरण**




**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** उजनी जलाशयात गोयेगाव (ता. करमाळा) ते आगोती (ता.इंदापूर) दरम्यान पुल बांधण्यात यावा अशी मागणी शिवसेना नेते दिग्विजय बागल यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे प्रत्यक्ष निवेदनाद्वारे केली होती. याचीच दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गोयेगाव ते आगोती दरम्यान पूल उभारण्यासाठी वित्त व नियोजन विभागास अर्थिक तरतूद करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अकलूज येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने अंतिम आराखडा तयार करण्यासाठी ऐजंसी नियुक्त करुन गुरुवार (दि.०५) रोजी सर्वेक्षणास सुरुवात केली.

या सर्वेक्षणावेळी वाशिंबे,गोयेगाव परिसरातील नागरिक उपस्थित होते. आगोती, बनगरवाडी, कळाशी परिसरातील येथील प्रमुख व्यक्ती व इंदापूर येथील बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्याकडून आवश्यक माहिती घेण्यात आली. या वेळी गोयेगाव (वाशिंबे) हे ठिकाण डिकसळ पुलापासून २६ किलोमीटर व कुंभेज फाटा (राष्ट्रीय महामार्ग) पासून २६ किलोमीटर अंतरावर असल्याने हे ठिकाण करमाळा तालुक्यातील उमरड ते टाकळी दरम्यानच्या नागरिकांना दळणवळणासाठी सोईस्कर असून या दरम्यान पूल झाल्यास या परिसरातील नागरिकांना इंदापूर येथे जाण्यासाठी सोईस्कर होणार असल्याने उजनी लाभक्षेत्रातील गावे हाकेच्या अंतरावर येणार आहेत.

# प्रभाग क्र. 21 मध्ये गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या 26 व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून प्रभाग क्रमांक 21 मध्ये गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप काल रोजी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मान्यवरांच्या उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी शालेय विद्यार्थ्यांना वह्या पेन पेन्सिल व शालेय साहित्य वाटप ताज सोशल ग्रुप आणि नगरसेवक तौफिक शेख यांच्या प्रयत्नाने करण्यात आले.

यावेळी आलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते साहित्य चे वाटप करण्यात आले, दरम्यान या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राज्य प्रवक्ता उमेश पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष संतोष पवार, शहर कार्याध्यक्ष जुबेर बागवान, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते दयमा शेटजी, महाराष्ट्र उपाध्यक्ष किसन जाधव, अदनान शेख, रिजवान मुल्ला, एजाज शेख सर, महाराष्ट्राचे सचिव इरफान एमडी शेख, राष्ट्रवादी महिला आघाडीचे शहराध्यक्ष जोगधनकर मॅडम, माजी नगरसेविका वाहेदा आप्पा शेख तसलीम इरफान शेख व दक्षिणचे पाटील ताई यांची उपस्थित होते, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाजसेवक आसिफ राजे शेख, इरफान शेख, जावेद सय्यद, उर्फ वास्तव, तौसीफ सगरी, जुबेर इनामदार, जावेद खऊ साजिद शेख, असलम शेख, मोहसीन शेख, सईद इनामदार उर्फ टिंकू, अखिल नाईकवाडी, नबीलाल नदाफ, ताज पेंटर, शाहिद फुफा, आरिफ लालूकोट, गौस तांबोळी, यासीन हुंडेकरी, इसाक शेख, मुसा भाई शेख, मोहम्मद शेख चाचा, दाऊद शेख, सईद शेख, मुज्जू कलवल, गणी भाई शेख, जावेद कल्याणी, वशिम वस्ताद, पठाण चाचा, कलवल चाचा, यांनी परिश्रम घेतले, या कार्यक्रमाला नई जिंदगी येथील सिद्धेश्वर नगर तसेच इतर नगरातील सर्व जमातीचे अध्यक्ष व पदाधिकारी तसेच ताज सोशल ग्रुपचे कार्यकर्ते शुभचिंतक व महिला भगिनी तसेच, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महापालिकेच्या गलथान कारभारामुळे सिव्हिल हॉस्पिटल जवळ दररोज लाखो लिटर पाण्याची नासाडी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरला दुहेरी पाईपलाईनचे काम होऊन सुद्धा सात दिवसाला एकदा पाणीपुरवठा होत आहे. एक लिटर पाणी प्रक्रिया करण्यासाठी महानगरपालिकेस अंदाजे एक रुपया खर्च होत आहे. असे असताना सुद्धा सिव्हिल हॉस्पिटल मागील सोलापूर महानगरपालिकेच्या पाण्याच्या टाक्यांमधून व लष्कर व लोधी गल्ली या झोन आठ मध्ये असंख्य अनधिकृत नळांमधून दररोज पाण्याची नासाडी होत आहे.

आज पहाटेपासून सिव्हिल हॉस्पिटलच्या मागील रस्त्यावरून, आडके हॉस्पिटल ते अश्विनी रुग्णालय इथपर्यंत पिण्याच्या पाण्याचे लोट वाहत आहेत. अक्षरशः आडके हॉस्पिटल जवळील ड्रेनेज चेंबर मधून कारंजाच्या स्वरूपात स्वच्छ पिण्याचे पाणी वाहताना दिसत आहे. महानगरपालिकेने काही दिवसांपूर्वी येथील सार्वजनिक नळ बंद केले व त्यानंतर येथील प्रत्येक घरात एक पाऊण इंचाचे कमर्शियल व अनधिकृत नळाचे कनेक्शन येथील लोकांनी घेतलेले आहे. विशेष म्हणजे ते बंद करण्यासाठी तोट्या सुद्धा लावलेल्या नाहीत. याबाबतीत गेले वर्षभर वारंवार तक्रार केलेल्या आहेत. येथून दररोज पाण्याची नासाडी होत असते व येथे नव्याने बनवलेला रस्ता उखडून या रस्त्याला अक्षरशः गटारीचे स्वरूप आलेले आहे. त्यामुळे परिसरात अतिशय दुर्गंधी पसरलेली आहे. याबाबतीत डॉ. संदीप आडके यांनी सोलापूर महानगरपालिका आयुक्त व सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना वारंवार लेखी तक्रारी देऊन सुद्धा त्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे शेवटी आज त्यांनी मुख्यमंत्री व मुख्य सचिव यांना ई–मेल व फोटो द्वारे सोलापूर महानगरपालिकेच्या गलथान कारभारावर कारवाई करा. राष्ट्रीय संपत्तीची नासाडी व लोकांच्या टॅक्स रुपी पैशातून होत असलेल्या नासाडीवर सर्व संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्याचे विनंती केलेली आहे.

विशेष म्हणजे काही दिवसापूर्वी सोलापूर महानगरपालिकेने पाण्याची नासाडी करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल असे प्रसिद्धी पत्रक अनेक वृत्तपत्रात देऊन खर्च केलेला आहे व काही ठिकाणीच तुटपुंजी कारवाई करून त्यावर प्रसिद्ध मिळवली आहे. दुसरीकडे करोडो रुपये खर्च करून टॅंकरने पाणीपुरवठा करत आहे. यातून महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांचा भ्रष्ट कारभार उघड होत आहे.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**दि.क.अर्ज क्र:३८९/२०२५ नि.०६**

**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्रीमती व्ही.ए. कुलकर्णी.यांचे कोर्टात, सोलापूर.**

नागराज रायेशम बत्तुल
वय – ४९ वर्षे धंदा– मजुरी
रा.. २९ / २ न्यु सुनिल नगर, एम आय डी सी सोलापूर. } **अर्जदार**
कोणी नाही
**विरुध्द**
कोणी नाही } **सामनेवाला**

यातील सदर मिळकतदार मयत कै. सुशिलाबाई रायेशम ऊर्फ राजेशम बत्तुल यांचे दि. ०७/१२/२०२४ रोजी सोलापूर येथे निधन झालेले आहे मयताचे पती कै. रायेशम ऊर्फ राजेशम भूमय्या बत्तुल यांचे दि. ०५/०४/१९८० रोजी सोलापूर येथे निधन झालेले आहे तर अर्जदार हा मयताचा मुलगा असून. मयताचे नावाने शहर सोलापूर हदवाढीतील न्यु सुनिल नगर यामधील प्लॉट नं. २९/२ घरजागा मिळकत असून मयताचे पश्चयात अर्जदार यांना मयताचे अर्जदार वारसदार असलेबाबत वारसप्रमाणपत्र लागणार असून वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता हल्लीचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसाचे आत अथवा नेमलेली तारीख–१६/०७/२०२५ रोजी स्वता: अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून म्हणणे न आल्यास काहीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होवून अर्जदारास संबंधी दाखला देण्यात येईल.

आज दिनांक – १७/०६/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

**हुकूमावरुन**
**सहा. अधिक्षक**
(लिपिक) (शिक्का) **सोलापूर येथील दिवाणी न्यायालय व. स्तर, सोलापूर.**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**दि.क.अर्ज क्र:२३९/२०२५ नि.**

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो यांचे कोर्टात**

१) सौ. स्वाती दयानंद आमटे (लग्नानंतरचे नाव)
स्वाती श्रध्दानंद तोळणूर (लग्नापुर्वीचे नाव)
वय – ४७ वर्षे, धंदा : घरकाम, सध्या रा: २७/५, निराळे वस्ती, मुरारजी पेठ, सोलापूर – ४१३००१ कायमचा पत्ता: देवकी स्वानंदन, शिवमंदीर जवळ,सांगली नाका, ८/१४७२, मधुबन हौसिंग सोसायटी, इचलकरंजी, कोल्हापूर– ११५
२) सौ. शितल आकाश शिरते (लग्नानंतरचे नाव) } **अर्जदार**
शितल श्रध्दानंद तोळणूर (लग्नापुर्वीचे नाव)
वय – ४५ वर्षे, धंदा: घरकाम, रा: २७/५, निराळे वस्ती, मुरारजी पेठ, सोलापूर–४१३००१
३) दिपाली अरविंद आळगुंडगी (लग्नानंतरचे नाव)
दिपाली श्रध्दानंद तोळणूर (लग्नापुर्वीचे नाव)
वय– ४० वर्षे, धंदा: घरकाम, रा: नागणे देशमुख अपार्टमेंट, मागे १०, गणेश नगर, सम्राट चौक, सोलापूर –४१३००२.
**विरुध्द**
कोणी नाही } **सामनेवाला**

ज्याअर्थी मिळकतीचे वर्णन: डिा व सब ड़िा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर, पैकी शहर सोलापूर महानगरपालिका नवीन हद्दवाढमधील कसबे सोलापूर येथील कसबे सोलापूर जुना सर्व्हे नंबर १३९/१/२ नवीन सर्व्हे नंबर १३७/१/२ मधील खैरदी नगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मधील प्लॉट नं. १५ व १७ याचे प्रत्येकी क्षेत्र पुर्वपश्चिम ३५ फुट, दक्षिणोत्तर २८.७ असे १००० चौ. फुट. प्रमाणे दोन्ही प्लॉटचे एकुण क्षेत्र २००० चौ. फुट अथवा १८५.८७ चौ. मी. होतात. खुली प्लॉट जागा यांसी चतु:सिमा येणेप्रमाणे :– पुर्वेस :– प्लॉट नं. १६ व १८, पश्चिमेस :– रस्ता, दक्षिणेस:–प्लॉट नं. १९, उत्तरेस :– प्लॉट नं. १३, येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकतीमधील तंदगभुत वस्तुसहची मिळकत असे. यातील अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडिल मयत श्रध्दानंद मणणप्पा तोळणुर व आई मयत करुणा श्रध्दानंद तोळणूर यांची मुली आहेत. अर्जदार यांचे वडिल श्रध्दानंद मणणप्पा तोळणूर हे दिनांक ३१/०७/२०१२ रोजी व आई करुणा श्रध्दानंद तोळणूर या दिनांक १८/०८/२०१७ रोजी सोलापूर येथे राहत्या घरी निधन झालेले आहे. मयत श्रध्दानंद तोळणूर व करुणा तोळणूर यांना अर्जदार नं. १ ते ३ यांचे व्यतिरीक्त इतर कोणतेही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार नं. १ ते ३ या मयत श्रध्दानंद तोळणूर व करुणा तोळणूर यांचे कायदेशीर वर्ग –१ चे वारस आहेत.

त्याअर्थी सदर वारसदाखला देणेबाबत कोणाचीही हरकत वा तक्रार असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे किंवा मे कोर्ट नेमलेली ता.: १८/७/२५ रोजी मे. कोर्टात हजर राहून लेखी हरकत घ्यावी. अन्यथा पुढील आदेश केले जाईल याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण दिली ता.१७/०६/२०२५.

(लिपिक) (शिक्का) **सहा अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय सोलापूर**